## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची शैक्षणिक नियमिका प्रकाशित
## १८ जुलै पासून शैक्षणिक कार्याला सुरुवात
## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाकरिता शैक्षणिक नियमिका अधिसूचनेद्वारे प्रकाशित केली असून ती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेस्थळावर प्रसिद्ध केली आहे. प्रथम शैक्षणिक सत्र १ जुलै, २०२२ ते ३० नोव्हेंबर, २०२२ असे राहणार असून १ ते १६ जुलै, २०२२ प्रवेश प्रक्रिया, अभिक्रम प्रक्रिया (प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता) १८ जुलै ते २३ जुलै, २०२२ या दरम्यान असून शैक्षणिक दिवस २५ जुलै ते २२ ऑक्टोबर, २०२२ आणि ९ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०२२ राहणार आहे. २४ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर, २०२२ प्रथम सत्र अवकाश राहील.

दि. १ डिसेंबर, २०२२ ते २१ जानेवारी, २०२३ विषम सत्रांची विद्यापीठीय परीक्षा राहील. द्वितीय शैक्षणिक सत्र २३ जानेवारी ते २७ मे, २०२३ या कालावधीत असणार आहे. सम सत्रांची विद्यापीठीय परीक्षा २९ मे ते १ जुलै, २०२३ या कालावधीत राहील.

शैक्षणिक सत्र १ जुलै, २०२२ पासून सुरु झालेले आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

दि. ०७/०७/२०२२.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

Win2PDF®

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/